डॉ. सुब्राता एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांच्या "परदेश प्रशिक्षण" दौ-याकरीता मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -२०१७/प्र.क.४५/का-१४१८

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १६ एप्रिल, २०१९

वाचा:-

१.सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.परदौ-१४१४/प्र.क्र.४६/११, दि.२९.१२.२०१४
२.सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.परदौ-१४१६/प्र.क्र.११/११, दि.०२.०६.२०१६
३.संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांचे पत्र क्र. MRSAC/USA-Denver tour/१८७०/२०१८-१९, दि.२० मार्च, २०१९

प्रस्तावना:-

"डिजिटल ग्लोब, डेनवर, अमेरिका (USA)" या खाजगी संस्थेने दि.०६.०५.२०१९ ते दि.१०.०५.२०१९ (प्रवासाचा कालावधी वगळून) या कालावधीत आयोजित केलेल्या तांत्रिक प्रशिक्षणास डॉ.सुब्राता एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांना निमंत्रित केल्यानुसार या परदेश प्रशिक्षणास उपस्थित राहण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांच्याकडून संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये प्राप्त झाला असून या परदेश प्रशिक्षण दौ-याचा संपूर्ण खर्च "डिजिटल ग्लोब, डेनवर, अमेरिका (USA) या खाजगी संस्थेची भारतातील भागीदार "सिन्सेस टेक लि., नागपूर" यांचेमार्फत करण्यात येणार आहे.

२. "महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर" च्या प्रस्तावास अनुसरून संदर्भिय शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग दि.२९.१२.२०१४ व दि.०२.०६.२०१६ मधील तरतुदीनुसार प्रस्तावास शिफारस समितीची मान्यता व मा.मुख्यमंत्री महोदयांची संमती प्राप्त झालेली आहे. केंद्र शासनाच्या संबंधित विभागांची मान्यता मिळण्याच्या अधीन राहून तसेच "परदेश प्रशिक्षण दौऱ्याकरीता आवश्यक विदेश Political Clearance मिळविण्यासाठी" ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत संदर्भ क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४५/का.१४१८, दि.०२ एप्रिल, २०१९ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरून केंद्र शासनाच्या Ministry of External Affairs, New Delhi यांचेकडून EPC२८०३१९४६३६२ US, दि.१२०.४२०१.९ अन्वये डॉ.सुब्राता एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांना या "परदेश प्रशिक्षण" दौऱ्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

शासन निर्णय :-

डॉ.सुब्राता एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांना दि.०४ मे, २०१९ ते दि.१२ मे, २०१९ (प्रवासाच्या कालावधीसह) या कालावधीमधील "डिजिटल ग्लोब, डेनवर, अमेरिका (USA)" या खाजगी संस्थेने आयोजित केलेल्या "परदेश प्रशिक्षण" दौऱ्याकरीता उपस्थित राहण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. या दौ-याचा संपूर्ण खर्च डिजिटल ग्लोब, डेनवर, अमेरिका (USA) या खाजगी संस्थेची भारतातील भागीदार मे.सिन्सेस टेक लि., नागपूर यांचेमार्फत करण्यात येणार आहे.

२. डॉ. सुब्राता एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर यांनी त्यांच्या विदेश दौ-यासंबंधीचा विस्तृत अहवाल सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. परदौ-१४१४/प्र.क्र.४६/११, दि.२९.१२.२०१४ अन्वये दि.३० मे,२०१९ पर्यंत नियोजन विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४१६१७०४००६२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.04.16 17:29:42 +05'30'

(वि. फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय ,मुंबई -३२.
३. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय ,मुंबई -३२.
५. मा.मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२
६. प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर
७. डॉ. सुब्राता एन. दास, संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर
८. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहाय्यक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती,कार्यासन-१४१८.